सकाळ

# हिवाळी सत्रातील परीक्षा अंतिम टप्प्यात



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्राच्या ऑनलाईन परीक्षा अंतिम टप्प्यात आल्या असून आज एम. टेक., एमएस्सी., बीएस्सी. अभ्यासक्रमांच्या आठ परीक्षा झाल्या. तसेच एकूण १३ परीक्षांचे निकाल घोषित केले आहेत.

आतापर्यंत ४१२ परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत. सर्व विद्याशाखांच्या एम. फिल, प्री.पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा वर्षातून एकदा घेण्यात येत होती. या परीक्षा वर्षातून दोनदा ऑफलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज भरावयाची तारीख १२ एप्रिल आहे. तसेच अर्जांना ऑनलाईन मंजुरी देण्याची १३ एप्रिल तारीख आहे. परीक्षा महाविद्यालयाने, अधिविभागाने २५ एप्रिल ते १५ मे या कालावधीत आयोजित करावयात, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी कळवले आहे.

0 8 APR 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घरातील सांडपाणी घरातच मुरवण्याची संकल्पना



कुडित्रे येथील मृणाल कुंभार यांनी घरातील सांडपाण्यासाठी केलेला शोषखड्डा.

कुडित्रे (ता. करवीर) येथील मृणाल रामचंद्र कुंभार यांनी घरातील सांडपाणी घराच्या परिसरातच मुरवण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने शोषखड्डा तयार केला आहे. घराच्या मागे मोकळ्या जागेत सहा फूट लांब व साडेचार फूट रूंद खड्डा खोदला असून त्यामध्ये सुरुवातीला अडीच फुटांवर दगड, त्यानंतर साडेतीन फूट उंच व अडीच फूट सिमेंट पाईपलाईन, उरलेल्या खड्ड्यात दगड रचले. सिमेंट पाईपला वरती सहा इंची छिद्र पाडून त्यामध्ये सांडपाणी सोडले आहे.



**"एक काळ असा होता की आपण पंचगंगेचे पाणी ओंजळीने थेट पिऊ शकत होतो. मात्र, सध्या पंचगंगेची परिस्थिती दयनीय झाली. याचा विचार करता आता ठोस पावलं उचलायला हवेत. पंचगंगा वाचवा मोहिमेत सर्व घटकांनी सक्रिय योगदान द्यायला हवे.**

**– डॉ. पी. डी. राऊत,** माजी विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ

सकाळ

# डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान बुधवारी



विलास संगवे

कोल्हापूर, ता. ७ : समाजशास्त्र अधिविभागाने बुधवारी (ता. १३) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानाचे आयोजन केले आहे. यामध्ये भारतीय समाजशास्त्र संस्थेचे माजी अध्यक्ष आणि गुरुनानक देव विद्यापीठ (अमृतसर) येथील माजी अधिष्ठाता प्रा. डॉ. परमजित सिंग जज्ज यांचे व्याख्यान होणार आहे.

'प्रबोधन, तर्कसंगतता आणि समाजशास्त्राचा उदय : पुराणमतवादी प्रतिक्रिया समजून घेणे' या विषयावर मानव्यशास्त्र सभागृहामध्ये सकाळी ११ वाजता व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषविणार आहेत.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी विभागप्रमुख डॉ. एस. एन. पवार हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. दुपारी समाजशास्त्राच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन केले आहे, असे समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी सांगितले.

तरुण भारत

# विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेच्या उपाध्यक्षपदी डॉ. टी. एम. पाटील

**मुरगूड :** येथील जय शिवराय एज्युकेशन सोसायटी संचालित सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे उपप्राचार्य व राज्य शास्त्र विभाग प्रमुख डॉ. टी. एम. पाटील यांची शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद कार्यकारिणीवर उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. डॉ. पाटील यांनी यापूर्वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक अभ्यास मंडळावर सदस्य, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळावर सदस्य, विद्यापीठाच्या विशेष कक्षाचे सदस्य म्हणून काम केले आहे. साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेचा आदर्श शिक्षक, पत्रकार संघ कोल्हापूरचा उपक्रमशिल शिक्षक, ऑल जर्नेलिजम अँड फ्रेन्ड सर्कल महाराष्ट्र – गोवाचा समाजभुषण, अखिल महाराष्ट्र पत्रकार व पत्र लेखक मुंबई संघाचा राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार, संकेत कला अकादमीचा समाजरत्न आणि चैतन्य सृजन संस्थेचा ऋग्वेद अशा विविध पुरस्कारांनी डॉ. पाटील यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

राज्यशास्त्र आधी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवींद्र भणगे,भारती पाटील ,डॉ प्रकाश पवार, वासंती रासम ,प्राचार्य डॉ बी एम पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांचे मार्गदर्शन तर खासदार प्रा. संजय मंडलिक यांचे प्रोत्साहन लाभत आहे.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात बुधवारी डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान

कोल्हापूर : समाजशास्त्र अधिविभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय किर्तीचे समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान बुधवार (दि. १३) रोजी ११ वाजता होणार आहे. भारतीय समाजशास्त्र संस्थेचे माजी अध्यक्ष आणि पंजाब, अमृतसर येथील गुरुनानक देव विद्यापीठातील सामाजिकशास्त्रचे डॉ. परमजीत सिंग जज्ज यांचे व्याख्यान होईल. 'प्रबोधन तर्कसंगतता आणि समाजशास्त्राचा उदय : पुराणमतवादी प्रतिक्रिया समजून घेणे' हा त्यांच्या व्याख्यानाचा आशय आहे. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषविणार आहेत. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, समाजशास्त्राचे माजी विभागप्रमुख डॉ. एस. एन. पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच समाजशास्त्राच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या मेळावा होईल. तरी प्राध्यापक, सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी केले आहे.

सकाळ



कोल्हापूर : डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र रायकर यांना पुरस्कार प्रदान करताना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. प्रशांतकुमार वनंजे, अभय जायभाये आदी.

# प्रा. डॉ. राजेंद्र रायकर यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी व जिमखाना विभागप्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र रायकर यांना शिवाजी विद्यापीठाने उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार प्रदान केला. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे यांच्या हस्ते कार्यक्रम झाला.

२०-२१ मध्ये त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राबवलेल्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची दखल घेत पुरस्काराने सन्मानित केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये, अधिकारी व शिक्षक उपस्थित होते. डॉ. रायकर यांना डी. वाय. पाटील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. डी. वाय. पाटील, संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष मंत्री सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोष चेडे, अधिष्ठाता डॉ. अद्वैत राठोड, डॉ. प्रमोद चौगुले, डॉ. राहुल पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

08 APR 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू शिर्के 'एनसीसी'चे मानद कर्नल

## एनसीसीतर्फे पद बहाल : ब्रिगेडियर समीर साळुंखे यांच्या हस्ते बॅटन प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एन.सी.सी.) मुख्यालयामार्फत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना मानद कर्नलपद गुरुवारी बहाल करण्यात आले. यावेळी एनसीसीचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे प्रमुख उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाने सदैव एनसीसीला प्रोत्साहन देण्याची भूमिका स्वीकारली आहे. यामुळे या विद्यापीठाच्या कुलगुरूंना मानद कर्नलपद बहाल करताना अवर्णनीय आनंद होतो आहे, अशी भावना ब्रिगेडियर साळुंखे यांनी व्यक्त केली. विविध शिबिरे आणि अन्य उपक्रमांमुळे परीक्षांना मुकणाऱ्या एनसीसी छात्रांची फेरपरीक्षा घेऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान न होऊ देण्याची दक्षता विद्यापीठाकडून घेतली जाईल, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

कुलगुरूंच्या दालनातील या कार्यक्रमात ब्रिगेडियर साळुंखे यांच्या हस्ते डॉ. शिर्के यांना एनसीसीच्या इतमामाप्रमाणे मानद कर्नलपदाचे बॅज आणि एनसीसी बॅटन प्रदान करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व एनसीसी अधिकारी, छात्रांनी त्यांना मानवंदना देऊन अभिनंदन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एनसीसी कोल्हापूर ग्रुपचे ट्रेनिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल समीर मोहिते, एस. बी. सरनाईक, कर्नल डी. एस. सायना, एस. गणपती, मंजुनाथ हेगडे, विजयन थोरात, आदी उपस्थित होते. कॅप्टन डॉ. सुधाकर खोत यांनी स्वागत केले. सुनीता भोसले यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना एनसीसीच्या मानद कर्नल पदाची बॅटन प्रदान केल्यानंतर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### देशातील सहा कुलगुरूंच्या नावांना मंजुरी

नवी दिल्ली येथील एनसीसी मुख्यालयाला मानद कर्नलपदासाठी गेल्यावर्षी देशभरातून एकूण १६ कुलगुरूंच्या नावांची शिफारस केली होती. त्यापैकी अवघ्या सहा नावांना मंजुरी मिळाली. त्यामध्ये महाराष्ट्रातील दोन कुलगुरूंचा समावेश आहे. त्यात शिवाजी विद्यापीठाचे डॉ. शिर्के आणि दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत यांचा समावेश असल्याचे ब्रिगेडियर साळुंखे यांनी सांगितले.

सकाळ

# बदलांना सामोरे जाण्यासाठी क्षमतावर्धन आवश्यक

## डॉ. डी. टी. शिर्के; विद्यापीठात प्राचार्यांची विशेष बैठक

कोल्हापूर, ता. ७ : 'नजीकच्या काळात शैक्षणिक क्षेत्राला नव्या धोरणासह अनेक बदलांना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी महाविद्यालयांनी आपल्या क्षमता अधिक वृद्धिंगत करण्याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे,' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित प्राचार्यांच्या विशेष एकदिवसीय बैठकीच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. कोविडमुळे दोन वर्षांच्या खंडानंतर प्रथमच प्राचार्यांची ऑफलाईन बैठक घेतली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण केव्हाही लागू होऊ शकते. त्या दृष्टीने विद्यापीठ तयार आहे. महाविद्यालयांनीही तयारीत राहावे. धोरणापलीकडेही अनेक नवे अभ्यासक्रम, योजना, उपक्रम आणि मूल्यमापनाच्या अभिनव पद्धती विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून येत आहेत. त्यांचा आढावा घेण्यासाठी, कार्यवाही करण्यासाठी महाविद्यालयांनी एक स्वतंत्र कक्ष निर्माण करावा. युजीसी वेगवेगळे मसुदे वेबसाईटवर ठेवते. चर्चा करून महाविद्यालयांनी मते, सूचना, अभिप्राय युजीसीला द्यायला हवीत. विद्यापीठाच्या पत्रांची वाट न पाहता विद्यापीठालाही सूचना कराव्यात. ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्‌समुळे (एबीसी) विद्यार्थी कोणत्याही विद्याशाखेतील असला तरी त्यांना आवडीचे अभ्यासक्रम शिकण्याची मुभा असणार आहे. विद्यार्थी अन्य ठिकाणच्या अभ्यासक्रमांकडे आकर्षिला जाणे स्वाभाविक आहे. आपणही अन्य ठिकाणच्या विद्यार्थ्यांना आवडतील, आकर्षित करतील, अशा अभ्यासक्रमांची निर्मिती करण्याची गरज आहे.'' -प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# डॉ. राजेंद्र रायकर यांना उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार प्रदान



**शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के व राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रशांतकुमार वनंजे, पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना राजेंद्र रायकर.**

**कोल्हापूर :** डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी व जिमखाना विभागप्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र रायकर यांना शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राबवलेल्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमाची दखल घेत डॉ. राजेंद्र रायकर यांना हा पुरस्कार देण्यात आला. कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के व राष्ट्रीय सेवा योजनेचे संपर्क अधिकारी प्रशांतकुमार वनंजे याच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले. यावेळी प्र. कुलगुरू पी. एस. पाटील, प्र. कुलसचिव व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते. डी. वाय. पाटील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डी. वाय. पाटील यांचे आशीर्वाद व अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष गृह राज्यमंत्री सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील व कार्यकारी संचालक अनिलकुमार गुप्ता यांचे मार्गदर्शन लाभले.

0 8 APR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू डॉ. शिर्के यांना एनसीसीचे मानद कर्नलपद बहाल

कोल्हापूर : प्रतिनिधी

राष्ट्रीय छात्रसेनेच्या (एनसीसी) राष्ट्रीय मुख्यालयामार्फत मानद कर्नलपद बहाल करण्यात येणारे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांमधील एकमेव कुलगुरू आहेत, अशी माहिती एनसीसीचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिर्के यांना गुरुवारी सकाळी एनसीसीचे मानद कर्नलपद प्रदान करण्याचा समारंभ पार पडला. या समारंभात ते बोलत होते.

ब्रिगेडियर साळुंखे म्हणाले, नवी दिल्ली येथील एनसीसी मुख्यालयाला मानद कर्नलपदासाठी गत वर्षी देशभरातून एकूण सोळा कुलगुरूंच्या नावांची शिफारस करण्यात आली होती. तथापि, त्यापैकी अवघ्या सहा नावांना मंजुरी मिळाली. त्यामध्ये महाराष्ट्रातील दोन कुलगुरूंचा समावेश आहे. त्यात शिवाजी विद्यापीठाचे डॉ. शिर्के यांचा समावेश आहे.



कोल्हापूर : कुलगुरू डी. टी. शिर्के यांना एनसीसीच्या मानद कर्नलपदाची बॅटन प्रदान केल्यानंतर त्यांचे अभिनंदन करताना ब्रिगेडियर समीर साळुंखे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने नेहमीच एनसीसीला प्रोत्साहन दिले आहे. छात्रांनी सशस्त्र सैन्यदलातही अधिकारीपदी जावे, यासाठी सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड परीक्षांची तयारी करवून घेण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याच्या कामी ब्रिगेडियर साळुंखे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. त्या कामी विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करेल.

यावेळी कॅप्टन डॉ. सुधाकर खोत यांनी स्वागत, प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले, तर कॅप्टन सुनीता भोसले यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे, लेफ्टनंट कर्नल समीर मोहिते, लेफ्टनंट कर्नल एस. बी. सरनाईक, डी. एस. सायना, एस. गणपती, मंजुनाथ हेगडे, विजयन थोरात, पी. टी. गायकवाड, ए. एन. बसुगडे, जी.आर. पळसे, अजित चौगुले, आर. के. कामत, एस. एस. महाजन, आर. जी. कुलकर्णी, एम. एस. देशमुख, ए. एम. गुरव, नमिता खोत, आर. व्ही. गुरव, अभय जायभाये आदी उपस्थित होते.

0 8 APR 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू डॉ. शिर्के यांना मानद कर्नलपद

## छात्रसेनेतर्फे मानवंदना; राज्यातील फक्त दोघांना मिळाला बहुमान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना आज राष्ट्रीय छात्रसेनेचे (एनसीसी) मानद कर्नलपद एनसीसीचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. मानद कर्नलपदाचे बॅज आणि एनसीसी बॅटन कुलगुरू डॉ. शिर्के यांना प्रदान समारंभपूर्वक करण्यात आली. त्यानंतर एनसीसी अधिकारी व छात्र यांनी मानवंदना दिली.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एन. सी.सी.) राष्ट्रीय मुख्यालयामार्फत मानद कर्नलपद बहाल करण्यात येणारे कुलगुरू शिर्के हे महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांमधील एकमेव कुलगुरू आहेत, असे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांनी सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, लेफ्टनंट कर्नल समीर मोहिते, लेफ्टनंट कर्नल एस. बी. सरनाईक, कर्नल डी. एस. सायना, कर्नल एस. गणपती, कर्नल मंजुनाथ हेगडे, कर्नल विजयन थोरात आदी उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांना एनसीसीच्या मानद कर्नल पदाचा बॅज प्रदान करताना ब्रिगेडियर समीर साळुंखे व कर्नल डी.एस. सायना.

ब्रिगेडियर साळुंखे म्हणाले, ''एनसीसी मुख्यालयाला मानद कर्नलपदासाठी गतवर्षी सोळा कुलगुरुंच्या नावांची शिफारस केली होती. सहा नावांना मंजुरी मिळाली. त्यामध्ये महाराष्ट्रातील दोन कुलगुरुंचा समावेश आहे. त्यात शिवाजी विद्यापीठाचे डॉ. शिर्के आणि दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांचा समावेश आहे.''



मानद कर्नल तथा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी एनसीसी प्रशिक्षित व देशप्रेमाने भारित नागरिक निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. त्यामुळे विद्यापीठाने नेहमी एनसीसीला प्रोत्साहन दिल्याचे सांगितले.

कॅप्टन डॉ. सुधाकर खोत यांनी स्वागत, प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. कॅप्टन सुनीता भोसले यांनी आभार मानले. क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, मेजर डॉ. ए. एन. बसुगडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. आर. जी. कुलकर्णी, आयक्यूएसी संचालक डॉ. एम. एस. देशमुख, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. ए. एम. गुरव, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. नमिता खोत, शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.